

दैनिक सोलापूर

कटुसत्य

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १०४ वा | शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

माणसातला देवमाणूस

माझे माहेर पंढरी

कार्तिकी एकादशी शासकीय महापूजेस

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री

ना. एकनाथजी शिंदे

साहेब आपले पंढरी नगरीत

सहर्ष स्वागत...

स्वागतोत्सुक :

आमदार राजू (बापू) खरे

247 मोहोळ राखीव विधानसभा मतदार संघ, जि., सोलापूर



मल्लू डिजिटल

संपादकीय

विद्यापीठे वाढली, आता कौशल्यांची गुणवत्ता सिद्ध करा!

महाराष्ट्रात अवघ्या काही वर्षांत अकरा खासगी कौशल्य विद्यापीठांची स्थापना झाली आहे. राज्यातील पहिले सार्वजनिक कौशल्य विद्यापीठ, स्वतंत्र कायदेशीर चौकट, विविध शैक्षणिक संस्थांचा सहभाग आणि महानगरांपलीकडे होणारा विस्तार यांमुळे उच्च शिक्षणाचे एक नवे क्षेत्र आकाराला येत आहे.

मात्र, या विस्ताराचा विचार करताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, पूर्वीचे कौशल्यविकासाचे प्रयोग, शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यापीठांच्या दीर्घकालीन जबाबदाऱ्यांचाही विचार करावा लागेल.

महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रात गेल्या काही वर्षांत एक महत्त्वपूर्ण, पण तुलनेने कमी चर्चिला गेलेला बदल घडत आहे. राज्यात नव्या विद्यापीठांची स्थापना होणे ही बाब आता नवीन राहिलेली नाही. मात्र, विशिष्ट शैक्षणिक उद्देश, स्वतंत्र कायदेशीर चौकट आणि उद्योगविश्वाशी थेट संबंध असलेली विद्यापीठांची एक नवी श्रेणी विकसित होणे, ही निश्चितच लक्षवेधी घटना आहे. महाराष्ट्रातील कौशल्य विद्यापीठांचा उदय याच दृष्टीने पाहावा लागेल. दोन वर्षांपूर्वी सहा असलेली खासगी कौशल्य विद्यापीठांची संख्या आता अकरावर पोहोचली आहे. विशेष म्हणजे, २०२६ या एकाच वर्षात पाच नव्या विद्यापीठांची भर पडली. ही वाढ केवळ शैक्षणिक संस्थांच्या संख्येपुरती मर्यादित नाही. राज्यात उच्च शिक्षणाचे एक स्वतंत्र क्षेत्र आकाराला येत असल्याचे हे संकेत आहेत.

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेचा विस्तार केंद्रीय विद्यापीठे, राज्य शासनाची सार्वजनिक विद्यापीठे, खासगी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे (डीम्ड विद्यापीठे), तसेच भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या इतर शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून झाला आहे. या संस्थांचे प्रशासकीय आणि नियामक स्वरूप भिन्न असले, तरी केंद्रीय शिक्षण मंत्रालय, राज्यांचे संबंधित शिक्षण विभाग, विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतर सक्षम नियामक संस्था यांच्या व्यवस्थेत त्या कार्यरत आहेत. या प्रस्थापित व्यवस्थेच्या जोडीने महाराष्ट्रात आता कौशल्य विद्यापीठांची स्वतंत्र श्रेणी विकसित होत आहे. विशेष म्हणजे, राज्यातील खासगी कौशल्य विद्यापीठे ही उच्च व तंत्रशिक्षण विभागाऐवजी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्या कार्यक्षेत्रात येतात. त्यामुळे हा बदल केवळ आणखी एका प्रकारच्या विद्यापीठांच्या स्थापनेपुरता मर्यादित नसून, उच्च शिक्षणाच्या संस्थात्मक आणि प्रशासकीय रचनेत घडणाऱ्या नव्या प्रयोगाचेही द्योतक आहे.

एका नव्या क्षेत्राची पायाभरणी

या प्रक्रियेची सुरुवात अचानक झालेली नाही. महाराष्ट्रात शिक्षण आणि रोजगार यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्याची आवश्यकता अनेक वर्षांपासून व्यक्त होत होती. ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ आणि पद्मविभूषण पुरस्कारप्राप्त श्री. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखालील उच्च शिक्षणविषयक शिखर समितीने २०११ मध्येच विद्यापीठीय शिक्षणात व्यावसायिक आणि कौशल्याधारित घटकांना महत्त्व देण्याची गरज अधोरेखित केली होती. त्यानंतर कौशल्य विकासाला स्वतंत्र धोरणात्मक महत्त्व प्राप्त झाले. महाराष्ट्राने फेब्रुवारी २०२० मध्ये यासंदर्भात समिती स्थापन केली आणि पुढे २०२१ मध्ये कौशल्य विद्यापीठांच्या स्थापनेला कायदेशीर चालना मिळाली.

याच प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा म्हणजे महाराष्ट्र शासनाने २०२१ च्या अधिनियमाद्वारे स्थापन केलेले राज्यातील पहिले सार्वजनिक कौशल्य विद्यापीठ. २०२२ मध्ये कार्यरत झालेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे २०२४ मध्ये ज्येष्ठ उद्योगपती आणि समाजसेवक रतन टाटा यांच्या स्मरणार्थ 'रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ' असे नामकरण करण्यात आले. कौशल्याधारित उच्च शिक्षण, उद्योगांशी सहकार्य, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम आणि उद्योजकता यांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा या विद्यापीठामागील उद्देश आहे. या सार्वजनिक उपक्रमाच्या जोडीने खासगी क्षेत्रातील कौशल्य विद्यापीठांच्या स्थापनेलाही गती मिळाली.

या प्रक्रियेला २०२४ मधील महाराष्ट्र खासगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियमामुळे एकत्रित कायदेशीर चौकट प्राप्त झाली. विद्यापीठांची स्थापना, प्रकल्प अहवालाची छाननी, आवश्यक आर्थिक तरतूद, पायाभूत सुविधा आणि प्रत्यक्ष कामकाज सुरू करण्यापूर्वीची पडताळणी अशा विविध टप्प्यांची तरतूद या व्यवस्थेत आहे. यामुळे स्वतंत्र अधिनियमांच्या आधारे सुरू झालेल्या संस्थांना एका समान चौकटीत आणणे शक्य झाले. राज्याने केवळ काही नव्या विद्यापीठांना मान्यता दिलेली नाही, तर विशिष्ट शैक्षणिक उद्देश असलेल्या संस्थांच्या विकासासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली आहे. उच्च शिक्षणातील एखाद्या नव्या संकल्पनेचे संस्थात्मक क्षेत्रात रूपांतर कसे होते, याचे महाराष्ट्र हे अभ्यासनीय उदाहरण ठरू शकते.

मुंबई-पुण्यापलीकडे विस्तार

या क्षेत्राच्या वाढीकडे भौगोलिक दृष्टीने पाहिल्यास आणखी एक महत्त्वाचा बदल दिसतो. सुरुवातीच्या टप्प्यात कौशल्य विद्यापीठांचा विस्तार प्रामुख्याने मुंबई, नवी मुंबई आणि पुणे परिसरात केंद्रित होता. उद्योग, सेवा क्षेत्र, आर्थिक व्यवहार आणि नव्या तंत्रज्ञानाशी संबंधित कंपन्यांची उपस्थिती या भागात मोठ्या प्रमाणावर असल्याने ही निवड स्वाभाविक होती. मात्र, आता नागपूर, नाशिक, पालघर आणि लातूरसारख्या भागांतही या संस्थांचा विस्तार होत आहे.

महाराष्ट्रातील खासगी कौशल्य विद्यापीठांचा विकासक्रम पाहिला, तर गेल्या तीन वर्षांत या क्षेत्राला विशेष गती मिळाल्याचे दिसते. २०१७ मध्ये स्थापन झालेल्या सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीपासून २०२६ मध्ये स्थापन झालेल्या पाच नव्या विद्यापीठांपर्यंतचा प्रवास या क्षेत्राच्या विस्ताराची कल्पना देतो.

महाराष्ट्राने गेल्या काही वर्षांत कौशल्य विद्यापीठांच्या स्थापनेसाठी कायदेशीर आणि प्रशासकीय पायाभरणी केली आहे. आता या क्षेत्राची पुढील वाटचाल केवळ नवीन संस्थांच्या मान्यतेवर अवलंबून राहणार नाही. या विद्यापीठांची शैक्षणिक कामगिरी, उद्योगांशी असलेले प्रत्यक्ष संबंध, प्रादेशिक अर्थव्यवस्थेला मिळणारे योगदान आणि विद्यार्थ्यांचा दीर्घकालीन विकास यांवर तिचे मूल्यमापन होईल. या संस्थांच्या अनुभवांचे नियमित परीक्षण, त्यांच्या कामगिरीची तुलनात्मक माहिती आणि आवश्यक धोरणात्मक सुधारणा यांसाठी राज्यस्तरीय समन्वयाची व्यवस्थाही उपयुक्त ठरू शकते.

महाराष्ट्रातील कौशल्य विद्यापीठांचा उदय हा उच्च शिक्षणाच्या विस्तारातील आणखी एक टप्पा म्हणून पाहण्यापेक्षा विद्यापीठ या संस्थेच्या बदलत्या स्वरूपाचा प्रयोग म्हणून पाहणे अधिक उचित ठरेल. या प्रयोगाचे यश केवळ स्वतंत्र विद्यापीठे निर्माण करण्यात नसून, त्यांना व्यापक उच्च शिक्षण व्यवस्थेशी जोडण्यात, संस्थात्मक गुणवत्ता विकसित करण्यात आणि विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यात आहे. या संस्थांच्या माध्यमातून शिक्षण आणि रोजगार यांच्यातील संबंध अधिक दृढ होऊ शकतात; मात्र त्याचवेळी ज्ञान, संशोधन, सामाजिक समता आणि व्यापक बौद्धिक विकास या विद्यापीठांच्या मूलभूत जबाबदाऱ्याही जपाव्या लागतील. आज राज्याने या क्षेत्राला स्वतंत्र ओळख आणि कायदेशीर चौकट दिली आहे. उद्या त्याची खरी कसोटी ही विद्यापीठे किती वाढली यावर नव्हे, तर त्यांनी उच्च शिक्षणाच्या प्रस्थापित व्यवस्थेला किती नवे विचार, नवे मार्ग आणि नवी क्षमता दिली, यावर ठरणार आहे.

ज्ञानाचा वारसा जपूया; ऐतिहासिक ग्रंथालयांचे संवर्धन करूया!

पुस्तके ही केवळ कागदावर छापलेली अक्षरे नसतात, तर ती ज्ञानाचा, विचारांचा आणि संस्कृतीचा अमूल्य ठेवा असतात. प्रत्येक पुस्तकाच्या पानापानांत एका काळाचा इतिहास, समाजाचे अनुभव, विचारांची समृद्धी आणि पुढील पिढ्यांसाठी जतन केलेले ज्ञान सामावलेले असते. त्यामुळे ग्रंथालये ही केवळ पुस्तकांची साठवणूक करण्याची ठिकाणे नसून ती समाजाच्या वैचारिक आणि सांस्कृतिक प्रगतीची केंद्रे असतात. मात्र, दुर्दैवाने विकासाच्या आणि प्रशासकीय सोयीच्या नावाखाली अशा ऐतिहासिक ग्रंथालयांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते.

दिल्लीतील सुमारे १३५ वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या सेंट्रल सेक्रेटरिएट लायब्ररीतील पुस्तकांच्या संग्रहाच्या स्थलांतराचा विषय याच पार्श्वभूमीवर महत्त्वाचा ठरतो. या पुस्तकांचा संग्रह अन्यत्र हलवण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देऊन ज्ञानाच्या वारशाच्या संरक्षणाबाबत महत्त्वपूर्ण भूमिका घेतली आहे. न्यायालयाने केवळ काही पुस्तकांच्या स्थलांतराचा प्रश्न हाताळलेला नाही, तर ऐतिहासिक ग्रंथसंपदेचे महत्त्व आणि तिचे जतन करण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे.

ऐतिहासिक ग्रंथालयांतील पुस्तके ही त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचे दस्तऐवज असतात. त्यामध्ये तत्कालीन घटनांचे संदर्भ, समाजव्यवस्थेतील बदल, विचारवंतांचे चिंतन आणि इतिहासाच्या अनेक महत्त्वपूर्ण नोंदी दडलेल्या असतात. त्यामुळे अशा पुस्तकांचे महत्त्व त्यांच्या संख्येवर किंवा कपाटांमध्ये असलेल्या मांडणीवरून ठरवता येत नाही. त्यांचे खरे मूल्य त्यातून मिळणाऱ्या ऐतिहासिक संदर्भात आणि ज्ञानाच्या समृद्धीत असते.

आजच्या डिजिटल युगात इंटरनेटच्या माध्यमातून जगभरातील माहिती काही क्षणांत उपलब्ध होते. मात्र, इंटरनेटवरील माहिती आणि पुस्तकांच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या जतन झालेला ज्ञानाचा वारसा यांत मोठा फरक आहे. डिजिटल माध्यमे माहिती मिळवण्याचे उत्तम साधन असली, तरी ती पुस्तकांना आणि ग्रंथालयांना पर्याय ठरू शकत नाहीत. पुस्तकांचे वाचन माणसाला सखोल विचार करायला शिकवते, तर ग्रंथालये ज्ञानाच्या विविध शाखांचा परिचय करून देतात.

आपल्या देशात अनेक ऐतिहासिक ग्रंथालये, संग्रहालये, अभिलेखागारे आणि दुर्मीळ ग्रंथांचे संग्रह आहेत. मात्र, त्यांचे योग्य संवर्धन, देखभाल आणि संरक्षण करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा सर्वत्र उपलब्ध आहेत का, हा प्रश्न उपस्थित होतो. अनेक ठिकाणी जागेचा अभाव, निधीची कमतरता, अपुरी देखभाल आणि प्रशासकीय उदासीनता यांमुळे मौल्यवान ग्रंथसंपदा धोक्यात येण्याची शक्यता असते. ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे. विकासकामे आणि प्रशासकीय सुविधा महत्त्वाच्या आहेतच; परंतु विकासाच्या नावाखाली ऐतिहासिक वारशाचे नुकसान होता कामा नये. एखादी इमारत पुन्हा उभारता येते, आधुनिक सुविधा निर्माण करता येतात; परंतु नष्ट झालेला दुर्मीळ ग्रंथ, ऐतिहासिक दस्तऐवज किंवा ज्ञानाचा अमूल्य ठेवा पुन्हा निर्माण करता येत नाही. त्यामुळे अशा ग्रंथालयांबाबत कोणताही निर्णय घेताना इतिहासाचे महत्त्व, पुस्तकांचे संरक्षण आणि संशोधकांच्या गरजा यांचा विचार झाला पाहिजे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या हस्तक्षेपातून शासन आणि प्रशासनाने योग्य तो धडा घेण्याची आवश्यकता आहे. ऐतिहासिक ग्रंथालयांचे आधुनिकीकरण जरूर करावे; मात्र त्यांचे ऐतिहासिक स्वरूप आणि ज्ञानसंपदा अबाधित ठेवावी. दुर्मीळ पुस्तकांचे डिजिटायझेशन करावे, योग्य तापमान व आर्द्रता नियंत्रणाची व्यवस्था करावी आणि संशोधकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

शेवटी, ग्रंथालये ही कोणत्याही समाजाची वैचारिक संपत्ती असतात. पुस्तके जतन करणे म्हणजे केवळ भूतकाळातील आठवणी जपणे नव्हे, तर भविष्यातील पिढ्यांसाठी ज्ञानाचे दरवाजे खुले ठेवणे होय. आपल्या पूर्वजांनी जतन केलेला हा ज्ञानाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. कारण इमारतींचे बांधकाम पुन्हा करता येते; पण एकदा नष्ट झालेला इतिहास आणि ज्ञानाचा ठेवा पुन्हा उभा करता येत नाही. म्हणूनच विकासाच्या वाटेवर चालताना ज्ञानाचा वारसा जपणे तितकेच महत्त्वाचे आहे!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

निसर्ग संवर्धकांच्या सन्मानाने 'प्रिसिजन' ने दर्शविली सामाजिक कृतज्ञता

प्रिसिजन गप्पांना आल्हाददायक वातावरणात उत्साहात प्रारंभ

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- थं क्रिएटिव्ह पर्यावरण दक्षता कृती मंच संस्थेच्या निसर्गवारी उपक्रमाला तसेच सर्पमित्र आणि वन्यजीव संवर्धक राजेश ठोंबरे यांच्या पर्यावरण आणि निसर्ग संवर्धनाच्या अजोड कायार्ला सन्मानित करून प्रिसिजन फाउंडेशनने पुन्हा एकदा आपल्या सामाजिक कृतज्ञतेचे दर्शन घडविले.

१८ व्या वर्षीच्या प्रिसिजन गप्पांना शुक्रवारी हुतात्मा स्मृती मंदिरात आल्हाददायक वातावरणात उत्साहात प्रारंभ झाला. यावेळी पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावसकर, प्रशांत अवचट, राजेश ठोंबरे यांच्या झालेल्या प्रकट मुलाखतीतून त्यांच्या उत्तुंग समाजकायार्चा पट उलगडला.

प्रिसिजनच्या परंपरेनुसार ठीक ६.२५ वाजताच हुतात्मा स्मृती मंदिरातील रंगमंचाचा पडदा उघडला गेला आणि सोलापूरकरांच्या प्रचंड टाळ्यांच्या गजरात प्रिसिजन गप्पांचा मंच तीन दिवसीय गुजगोष्टींसाठी खुला झाला.

प्रिसिजन गप्पांच्या पहिल्या दिवशी शुक्रवारी पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावसकर यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. यंदाचा प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार शिरूर (जि. पुणे) येथील थं क्रिएटिव्ह पर्यावरण दक्षता कृती मंच संस्थेच्या निसर्गवारी उपक्रमाला देण्यात आला. निसर्गवारी या प्रकल्पाचे प्रवर्तक प्रशांत अवचट यांनी हा पुरस्कार स्वीकारला. तीन लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तर यंदाचा स्व. सुभाष रावजी शहा स्मृती पुरस्कार चाळीसगाव येथील सर्पमित्र आणि वन्यजीव संवर्धक राजेश ठोंबरे यांना देण्यात आला. दोन लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.



पुरस्कार वितरणप्रसंगी व्यासपीठावर प्रिसिजन कॅमशाफ्टचे चेअरमन यतीन शहा, प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, प्रिसिजन कॅमशाफ्टचे व्यवस्थापकीय संचालक करण शहा उपस्थित होते.

पुरस्कार वितरण समारंभानंतर पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावसकर, प्रशांत अवचट आणि राजेश ठोंबरे यांची प्रकट मुलाखत दत्ता जोशी (छत्रपती संभाजी नगर) यांनी घेतली. ही प्रकट मुलाखत उत्तरोत्तर रंगत गेली.

पद्मश्री डॉ. हिम्मतराव बाविसकर यांनी विंचू दंशामुळे होणाऱ्या मृत्यूला रोखण्यासाठी केलेल्या संशोधनाबद्दल माहिती दिली. ज्या परिसरात विंचूदंश झाल्यानंतर रुग्णाला उलटी झाली तर दुसऱ्या दिवशी मृत्यू निश्चित असल्यामुळे कुटुंबीय जिवंतपणीच त्याच्या अंत्यसंस्काराची तयारी करायचे, त्या परिसरात मृत्युदर शून्यावर आल्याचा घटनाक्रम डॉ. बाविसकर यांनी सांगताच सोलापूरकरांनी प्रचंड टाळ्यांनी त्यांना दाद दिली.

निसर्गवारीचे प्रवर्तक प्रशांत अवचट यांनी पंढरीच्या वारीमध्ये पळसाच्या पानापासून तयार केलेल्या एका पत्रावळीपासून सुरू झालेला पर्यावरण संवर्धनाचा प्रवास आठ कोटी पत्रावळीपर्यंत कसा झाला याची माहिती उपस्थितांना दिली. संतांनी सांगितलेला चराचर रक्षणाचा संदेश कृतीत आणण्याचा कार्यक्रम म्हणजे निसर्गवारी आहे, ही प्रशांत अवचट यांची भूमिका सोलापूरकरांना भावली. तर सर्पदंशामुळे मृत्युपंथाला लागलेले आणि त्यातून परत आलेले निसर्ग संवर्धक राजेश ठोंबरे यांनी स्वतःच्या प्राणरक्षणापासून हजारो जणांच्या प्राणरक्षणापर्यंतचा प्रवास सोलापूरकरांच्या समोर उलगडला. कृतिशील प्रबोधन, प्रथमोपचार आणि उपचारांची सोय या त्रिसूत्रीवर काम केल्यानंतर आज देशभरात तब्बल ३० हजारांहून अधिक तरुणांची फळी उभी झाल्याचे ठोंबरे यांनी सांगितल्यानंतर सोलापूरकरांनी त्यांच्या कार्याचे भरभरून कौतुक केले.

प्रिसिजनचे मुख्य जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रिसिजन गप्पा कार्यक्रमास सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

प्रिसिजन गप्पांमध्ये आज

प्रिसिजन गप्पांमध्ये शनिवारी प्रख्यात संगीत अभ्यासक आणि गायिका डॉ. मृदुला दाढे आणि सहकाऱ्यांचा 'रहे ना रहे हम' हा हिंदी संगीतकारांची गाणी आणि गप्पांचा कार्यक्रम होईल. कार्यक्रम ठीक सायंकाळी ६.२५ वाजता होणार असून रसिकांनी यावेळी उपस्थित रहावे, असे आवाहन प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केले आहे.

इंदापुरात SIR प्रक्रियेवरून राजकीय तापट

तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या समर्थनार्थ नेते एकवटले

इंदापूर (कटूसत्य वृत्त):- मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेवरून इंदापूर तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस राहुल मखरे, तालुकाध्यक्ष हनुमंत कोकाटे आणि माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य सचिन सपकाळ यांनी गंभीर आरोप केले आहेत. मतदार यादीतून पात्र मतदारांची नावे वगळण्याच्या कथित प्रकाराबाबत त्यांनी संशय व्यक्त केला आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याची मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, इंदापूर येथील शहा सांस्कृतिक भवनात तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या समर्थनार्थ आयोजित करण्यात येणाऱ्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी तहसीलदार बनसोडे यांच्या कामकाजाचे कौतुक करत त्यांच्या कार्यपद्धतीला समर्थन दर्शविले. तहसीलदारांच्या समर्थनार्थ विविध पक्षांचे नेते एकवटले असतानाच, रक्कप्रक्रियेच्या माध्यमातून मतदारांच्या हक्कांचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे. त्यामुळे इंदापूरच्या राजकीय वर्तुळात या घडामोडींची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

SIR वरून आरोप

SIR प्रक्रियेच्या माध्यमातून दलित आणि मुस्लिम समाजातील मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्याचा प्रयत्न भाजपने करू नये, असा इशारा पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष संजय सोनवणे यांनी दिला. मतदार यादीचे पुनरीक्षण निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने राबविण्याची मागणीही त्यांनी केली. प्रत्येक पात्र मतदाराला मतदानाचा हक्क मिळावा आणि कोणताही मतदार यादीतून अन्यायपणे वगळला जाऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.



यावेळी राहुल मखरे यांनी मतदारांची नावे वगळण्याच्या कथित प्रकारासंदर्भात काही व्हॉइस रेकॉर्डिंग सादर करत भाजपवर गंभीर आरोप केले. या कथित ध्वनिमुद्रणांच्या आधारे त्यांनी मतदार यादीतून नावे वगळण्याच्या प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला. त्यामुळे पत्रकार परिषदेत राजकीय वातावरण अधिकच तापल्याचे चित्र पाहायला मिळाले. रक्कप्रक्रियेत कोणताही पक्ष राजकीय फायद्यासाठी हस्तक्षेप करू नये, अशी मागणी त्यांनी केली.

तहसीलदारांना समर्थन

तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या कार्यपद्धतीला समर्थन देताना उपस्थित नेत्यांनी त्यांच्या कामाचे कौतुक केले. त्यांनी तहसील कार्यालयातील कामकाज प्रामाणिकपणे आणि निष्पक्षपणे सुरू आहे, असे म्हटले. तहसीलदारांच्या समर्थनार्थ एकवटलेल्या नेत्यांनी त्यांच्यावर होणाऱ्या आरोपांना विरोध दर्शविला. तहसीलदारांनी नागरिकांच्या हितासाठी काम करत असल्याचा दावाही त्यांनी केला.

या पत्रकार परिषदेला सभापती हर्षवर्धन लोंढे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील, उपनगराध्यक्ष बाळासाहेब ढवळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष अतुल झगडे, सचिन खामगळ, पंचायत समिती सदस्य दिलीप भिसे, पोपट शिंदे आणि शेखर पाटील यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. या सर्वांनी तहसीलदार बनसोडे यांच्या कामाला पाठिंबा दर्शविला.

विरोधात मोर्चाचे नियोजन

दरम्यान, तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या कारभाराविरोधातही नाराजी व्यक्त होत असून, २५ नोव्हेंबरला तहसील कार्यालयावर सर्वपक्षीय मोर्चाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यांच्या कारभाराची चौकशी व्हावी आणि निलंबन करावे, अशी मागणीही या मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. तहसील कार्यालयातील कथित अनागोंदी कारभार आणि तहसीलदारांच्या कार्यपद्धतीविरोधात हा मोर्चा आयोजित करण्यात येत आहे.

या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर भाजपसह विविध पक्षांचे नेते एकवटले आहेत. तहसील कार्यालयातील कामकाजात विलंब, नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष आणि प्रशासकीय कारभारातील कथित त्रुटी यावरून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. या मोर्चामुळे तहसीलदारांच्या कार्यपद्धतीबाबत अधिक चर्चा होण्याची शक्यता आहे.

प्रशासनाची भूमिका

या आरोपांच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार जीवन बनसोडे यांनी स्पष्ट केले आहे की, तहसील कार्यालयात कोणाचेही काम जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवले जात नाही. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नसल्यास काम पूर्ण करता येत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. तक्रारी असल्यास नागरिकांनी लेखी अर्ज द्यावा किंवा वरिष्ठ कार्यालयाकडे दाद मागावी, असेही त्यांनी सांगितले आहे.

तहसीलदारांनी कोणत्याही नागरिकाचे काम विनाकारण प्रलंबित ठेवले नाही, असा दावा केला आहे. कामात विलंब होण्यामागे आवश्यक कागदपत्रांची कमतरता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. तक्रारींची नोंद आणि त्यावरील कारवाई योग्य पद्धतीने होईल, अशी खात्रीही त्यांनी दिली आहे.

राजकीय चर्चेला वेग

एकीकडे तहसीलदारांच्या समर्थनार्थ नेते एकवटत असताना, दुसरीकडे रक्कप्रक्रियेत पात्र मतदारांची नावे वगळण्याची शक्यता आणि त्यामागील कथित राजकीय हस्तक्षेप यावरून आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. या वादामुळे इंदापूरच्या राजकीय वर्तुळात मतदार यादी पुनरीक्षणाचा मुद्दा आगामी काळात अधिक चर्चेत राहण्याची शक्यता आहे.

सोलापूर महापालिकेची सर्वसाधारण सभा तहकूब

सात दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर महानगरपालिकेची आज, शुक्रवार (दि. २० नोव्हेंबर) रोजी आयोजित सर्वसाधारण सभा दुःखवट्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर तहकूब करण्यात आली. सभेत शहरातील नगरसेवकांसह विविध क्षेत्रांतील सात दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सभेच्या सुरुवातीला दिवंगत नगरसेवक मधुसूदन जंगम (प्रभाग क्रमांक २४ अ) यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडण्यात आला. तसेच ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर, सोलापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते प्रा. शिवाजी सावंत यांच्या मातोश्री भिवराबाई जयवंत सावंत, ज्येष्ठ पत्रकार प्रताप आसबे, ज्येष्ठ अभिनेत्री व लावणी कलावंत मधू कांबीकर, ज्येष्ठ इतिहासकार डॉ. प्रभाकर गाडे आणि दैनिक पुढारीचे नागपूर प्रतिनिधी तथा ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र उंटवळवार यांच्या निधनाबद्दलही सभेत दुःख व्यक्त करण्यात आले.

या सर्व दिवंगत व्यक्तींच्या निधनामुळे संबंधित कुटुंबीयांवर ओढवलेल्या दुःखात सभागृह सहभागी असल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी नमूद केले. त्यानंतर दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सभागृहात दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.

दिवंगतांना श्रद्धांजली वाहिल्यानंतर सर्वसाधारण सभा तहकूब करण्यात आली.

वात्रटिका

साकडे यांचे त्यांचे

वारकरी आणि नेत्यांच्या
गर्दीत विठ्ठल सापडला...
मागणे तर दोघांचेही आहे
विठ्ठलही कोड्यात पडला...
एक मागतो जगासाठी
अंतःकरण आणि मनातून...
दुसरा मागतो आठवून आणि
ध्यानात आणून आणून...

हणमंत पडवळ
धाराशिव
8698067566

कामगारांच्या हितसंबंधबाबत जनजागृती श्रमसंवाद कार्यशाळा संपन्न

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- केंद्र शासनाच्या चार कामगार संहितांची प्रभावी अंमलबजावणी वैधानिक अनुपालन आणि कामगारांच्या हितसंरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित श्रमसंवाद कार्यशाळेत सोलापूर जिल्ह्यातील 125 हून अधिक औद्योगिक व व्यावसायिक आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उत्सफूर्त सहभाग दर्शविला. कामगार विभागाच्या वतीने 18 नोव्हेंबर 2026 रोजी चिंचोली एमआयडीसी उद्योग भवन येथे सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये विविध औद्योगिक आस्थपनांचे व्यवस्थापन प्रतिनिधी, मानव संसाधन व्यवस्थापक, कायदेविषयक व्यवस्थापक व सनदी लेखापाल आदी उपस्थित होते.



कार्यशाळेत नियोक्तांना आवश्यक अनुपालविषयक बाबी आणि कामगारांच्या हितसंरक्षणासाठी असलेल्या तरतुदींबाबत (केंद्रीय) कामगार कल्याण आयुक्त श्री. ए. माधवन व (केंद्रीय) श्रम प्रवर्तन अधिकारी केंद्रीय श्री. मोहम्मद नदीम यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेची उद्दिष्टे, पत्रात व लाभ याबाबत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाचे सोलापूर सहाय्यक आयुक्त श्री. संजय गर्ग यांनी माहिती दिली. प्रश्नोत्तर सत्रात कंपनी व्यवस्थापन प्रतिनिधींनी उपस्थित केंद्रीय अधिकारी तसेच कामगार उपायुक्त, पुणे श्री. अभय गिते व सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर श्री. मंगेश झोले यांनी केले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

उपळे दुमाला येथे बीडीचा कट्टा मागण्यावरून वाद

ऊसतोड मजुराला कोयत्याने मारहाण

बार्शी (कटूसत्य वृत्त):- बीडीचा कट्टा मागितल्याच्या कारणावरून झालेल्या वादात ५६ वर्षीय ऊसतोड मजुराला शिवीगाळ, लाथाबुक्क्यांनी मारहाण तसेच ऊसतोडीच्या कोयत्याने जखमी केल्याची घटना बार्शी तालुक्यातील उपळे दुमाला येथे घडली. या प्रकरणी एका महिलेसह तिघांविरुद्ध वैराग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उत्तम बंशी थोरात (वय ५६, रा. सौंदरे, ता. बार्शी) असे जखमी मजुराचे नाव असून, मुन्ना भाभी (रा. उपळे दुमाला झोपडपट्टी), अरविंद यादव (रा. फत्तेहपूर, उत्तर प्रदेश) आणि त्याचा एक अनोळखी मित्र अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, उत्तम थोरात हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. ऊसतोड हंगाम सुरू असल्याने ते गेल्या महिन्यापासून उपळे दुमाला परिसरात कामासाठी आले असून हळदुगे येथे कोपीवर वास्तव्यास आहेत.

सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजण्याच्या सुमारास शेतकरी चिवू माळी यांच्या शेतातील ऊसतोडीचे काम आटोपून थोरात हे सहकाऱ्यांसह पायी कोपीकडे जात होते. वाटेत उपळे दुमाला येथील झोपडपट्टी परिसरात बीडीचा कट्टा घेण्यासाठी ते मुन्ना भाभी यांच्या घराजवळ थांबले.

त्यांनी दोन ते तीन वेळा बीडीचा कट्टा मागितल्याने मुन्ना भाभी यांनी चिडून त्यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. थोरात यांनी शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, त्यांना कानाखाली मारण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

याचवेळी तेथे मद्यधुंद अवस्थेत असलेल्या अरविंद यादव आणि त्याच्या मित्राने थोरात यांच्या हातातील ऊसतोडीचे कोयते हिसकावून घेतल्याचा आरोप आहे. त्यानंतर कोयत्याने थोरात यांच्या डाव्या कानावर मारहाण करून हिंदी भाषेत शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

मुन्ना भाभी यांनीही थोरात यांच्या डाव्या गालावर चापटा मारल्याचा आरोप असून, कोयते स्वतःकडे ठेवून घेत, "तुला हे कोयते देणार नाही, काय करायचे ते कर," अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर दोघांना तेथून पळवून लावल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

मारहाणीत जखमी झालेल्या उत्तम थोरात यांना त्यांचे परिचित बबन उकिरडे आणि शशिकांत पाटोळे यांनी दुचाकीवरून तातडीने मळेगाव येथील रुग्णालयात उपचारासाठी नेले. त्यानंतर बार्शी ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना धाराशिव येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर थोरात यांनी शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी वैराग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

थोरात यांच्या फिर्यादीवरून मुन्ना भाभी, अरविंद यादव आणि त्याच्या एका अनोळखी साथीदाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील कलम ११८(१), ३५१(२), ३५२ आणि ३(६) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास वैराग पोलीस करीत असून, घटनेतील आरोपांची तपासणी सुरू आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाड्याने पाहिजे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहाकरीता सर्व सोयीने युक्त खाजगी इमारत भाड्याने हवी आहे. इमारतीचे क्षेत्रफळ 10000 चौ. फूट पर्यत असावे. इमारतीमध्ये 25 ते 30 खोल्या, स्वतंत्र 10 शौचालय, 10 वायरूम, स्वतंत्र वीज व्यवस्था, पिण्याचे पाण्याची सोय, वापरण्याच्या पाण्याची साठवणूक सोय, तसेच इमारतीभोवती संरक्षक भिंत व पार्किंगची सोय असणे आवश्यक आहे.

तरी माळशिरस नगरपरिषद हद्दीतील इच्छुक इमारत मालकांनी तात्काळ 7 दिवसांच्या आत पुढील पत्त्यावर संपर्क साधावा असे आवाहन व्यवस्थापक वसतिगृह माळशिरस यांनी केले आहे. मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सोलापूर, सामाजिक न्याय भवन सात रस्ता चौक सोलापूर व गृहपाल क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह माळशिरस, म्हसवड रोड माळशिरस या ठिकाणी संपर्क साधावा

भोसले पिता-पुत्र हे समाजासाठी जगणारी माणसे : निलेश लंके



अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष- जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष- अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून अप्रतिम व मोठ्या प्रमाणात स्वामी भक्तांकरिता महाप्रसाद देण्याचे कार्य सुरु आहे. हे कौतुकास्पद असून, भोसले पिता-पुत्र हे समाजासाठी जगणारी माणसे असल्याचे गौरवास्पद मनोगत खासदार व अहिल्या नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके चे नूतन संचालक-निलेश लंके यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष- अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी न्यासचे पुरोहित विश्वंभर पुजारी, रुद्रय्या स्वामी, अतिश पवार, शुभम सावंत, एस.के.स्वामी, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, दत्ता माने, कल्याण देशमुख, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, राहुल इंडे, विशाल घाटगे, दत्ता मोरे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.

मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर

संपर्क - 9422602337, 8317212037

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी रिक्त पदे भरण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल- सभापती चेतनसिंह केदार-सावंत



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे आणि जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर व्हावी, या उद्देशाने सोलापूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत समुपदेशन प्रक्रियेद्वारे ६७ शिक्षकांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील शैक्षणिक व्यवस्थेला मोठे बळ मिळणार असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षकांची उपलब्धता वाढवून अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

जिल्ह्यातील अनेक ग्रामीण शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होत होता. अशा परिस्थितीत ६७ शिक्षकांच्या नियुक्तीमुळे शाळांमधील अध्यापन प्रक्रिया अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्यांना नियमित शिक्षण मिळण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा घडवून आणण्यासही या नियुक्त्या उपयुक्त ठरणार आहेत.

यावेळी जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत म्हणाले की, ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे, ही जिल्हा परिषदेची प्राथमिकता आहे. नवनियुक्त शिक्षकांनी केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्य, आत्मविश्वास आणि चांगले संस्कार रुजविण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

शिक्षक हे विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे महत्त्वाचे घटक आहेत. शिक्षकांच्या योगदानातून सक्षम पिढी निर्माण होते आणि सक्षम पिढीतून समाज व राष्ट्राची प्रगती साध्य होते.

त्यामुळे ग्रामीण भागातील शाळा अधिक सक्षम करणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे यासाठी शिक्षण विभाग सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

६७ शिक्षकांच्या नियुक्तीमुळे सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला नवी दिशा आणि बळ मिळणार असून, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दिपकजी वैद्य, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीतजी पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशलजी जैन, प्राथमिक शिक्षण अधिकारी विशाल मुळे व तालुका गट शिक्षण अधिकारी उपस्थित होते

प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे - डॉ. रामदास टोणे



माढा (कटूसत्य वृत्त):- बार्शी, माढा व करमाळा तालुक्यातील 12 वर्षे अखंडित शैक्षणिक सेवा पूर्ण केलेल्यासाठी वरिष्ठ व 24 वर्षे सेवा पूर्ण केलेल्यासाठी निवड श्रेणीसाठीचे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार 10 दिवसीय प्रशिक्षण सुरू आहे.या ठिकाणचे केंद्र समन्वयक,तज्ञ मार्गदर्शक व सर्व प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण विभागाच्या वतीने जे नियम व निर्देश दिले आहेत त्यांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन वेळापूर येथील डायटचे अधिव्याख्याता प्रा. डॉ.रामदास टोणे यांनी केले.

ते कुर्डूवाडी ता.माढा येथे विनायकराव पाटील विद्यालयात सुरू असलेल्या तीन तालुक्यातील 260 प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणास भेटीच्या वेळी बोलत होते.

या प्रशिक्षणासाठी केंद्र समन्वयक म्हणून पंचायत समितीचे अंकुश पांचाळ,डायटचे समन्वयक सुभाष राऊत, महादेव सोनवणे तज्ञ मार्गदर्शक म्हणून सुहास जोशी,भगवान साळवे,संतोष परबत, तंत्रस्नेही शिक्षक धनाजी घाडगे यांच्यासह इतर तज्ञ मार्गदर्शक कामकाज पाहत आहेत

पुढे डॉ.टोणे यांनी सांगितले की, या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांना जे शैक्षणिक बदल, नवनवीन प्रयोग, ज्ञान, माहिती, तंत्रज्ञान, कौशल्ये आत्मसात होतील त्याचा वापर विद्यार्थ्यांना अध्यापन करताना प्रभावीपणे केला पाहिजे.या प्रशिक्षणातून शिक्षक अपडेट व अपग्रेड व्हावेत ही शासनाची व डायटची भूमिका आहे.शिक्षकांनी अध्यापन करताना पाठ्यपुस्तकातील ज्ञान, माहिती व तंत्रज्ञानाची व्यवहारज्ञानाशी सांगड घातली पाहिजे.चांगले संस्कार व नैतिकता रुजवली पाहिजे.कृत्रिम बुद्धिमत्तेचाही प्रभावीपणे वापर केला पाहिजे असे आवाहन केले.

यावेळी माढा, बार्शी व करमाळा तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील 260 शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या.

सोलापूर शहरात मनाई आदेश लागू

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहर सार्वजनिक शांतता आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) सोलापूर शहर अश्विनी पाटील, यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 चे कलम 37 चे उप कलम (1) आणि (2) याद्वारे दिनांक 21 नोव्हेंबर 2026 रोजी 00. 01 वाजले पासून ते दिनांक 05 डिसेंबर 2026 रोजीचे मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत या कालावधीसाठी पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्दीत खालील गोष्टींना प्रतिबंधित करण्यात येत आहे

शस्त्रे, अग्निशस्त्रे, बॅटन, तलवारी, भाले, दंडुके, सोटे, विना परवाना बंदुका, चाकु, काठ्या किंवा लाठ्या किंवा इत्तर कोणतीही वस्तू जी शारिरीक हानी (हिंसा) करण्यासाठी वापरली जाऊ शकते अशी हत्यारे बाळगणे ज्या अधिकाऱ्याने परवाना दिला असेल किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडुन अशी शस्त्रे वाहुन नेण्यासाठी विशिष्ट परवानगी मागितली असेल अशा बंदुकासाठी बगळता.

कोणताही पदार्थ किंवा स्फोटके वाहून नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा उपकरणे किंवा क्षेपणास्त्रे टाकण्याची किंवा प्रक्षेपित करण्याची स्वधने, वाहून नेणे, गोळा करणे आणि तयार करणे, व्यक्ती किंवा प्रेत किंवा आकृती किंवा पुतळे यांचे प्रदर्शन, सार्वजनिक टिकाकरण उच्धार गाणी गाणे संगीत वाजवणे,

सोलापूर शहरात तैनात असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याच्या मते शालीनता किंवा शिष्टाचाराच्या विरोधात असणारी चित्रे चिन्हे फलक किंवा इतर कोणतीही वस्तू किंवा वस्तू तयार करणे प्रदर्शन करणे किंवा प्रसारीत करणे जेणे करून सामाजिक नैतिकता किंवा सुरक्षा धोक्यात येईल किंवा राज्य उलथुन टाकणेस कारणीभुत ठरू शकेल.

जर कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही वस्तूसह सशस्त्र जात असेल किंवा अशा प्रतिबंधाचे उल्लघन करत कोणताही उपरोधक पदार्थ किंवा स्फोटक किंवा क्षेपणास्त्र घेवून जात असेल तर तो/ती कोणत्याही पोलीस अधिकाऱ्या मार्फत निशस्त्र होण्यास जबाबदार असेल किंवा त्याच्याकडून संक्षारक पदार्थ किंवा स्फोटक किंवा क्षेपणास्त्र जप्त करण्यास जबाबदार असेल त्यांचे कडील जप्त केलेली वस्तू उपरोधिक पदार्थ स्फोटक किंवा क्षेपणास्त्र राज्य सरकारकडे जमा करणेत येईल

हा आदेश कोणत्याही सरकारी किंवा सरकारी उपक्रमाच्या सेवेत किंवा नोकरीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्याच्या वरिष्ठांना किंवा त्याच्या कर्तव्याच्या स्वरूपानुसार शस्त्रे बाळगण्यासाठी लागु होणार नाही, हा आदेश खाजगी सुरक्षा रक्षक किंवा गुरखा किंवा चौकीदार इत्यादीना लागु होणार नाही. जे 3 १/२ फुट लांबीपर्यंतच्या लाठ्या बाळगत आहेत.

तसेच पुढे असे निर्देश आहेत की, सोलापूर शहर सदर आदेशाच्या प्रती सुस्पष्ट सार्वजनिक ठिकाणी चिकटवून आणि लाऊडस्पिकर किंवा मेगाफोनद्वारे घोषित करून तसेच उपलब्ध कोणत्याही स्वरुपाच्या माध्यमाद्वारे प्रकाशित करुन प्रकाशित केला जाईल.

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या नियंत्रणाखालील भागात सार्वजनिक शांतता बिघडवणे आणि मानवी जिवीतास धोका आणि मालमत्तेची हानी आणि कोणत्याही प्रकारची दंगल रोखण्यासाठी पाच किंवा अधिक व्यक्तीच्या हालचाली आणि बेकायदेशीर एकत्र येण्यावर प्रतिबंध घालण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश जारी करणे हिताचे मानले जाते.

पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) सोलापूर शहर, अश्विनी पाटील, महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 मधील पोटकलम (3) द्वारे मला बहाल केलेल्या अधिकाराचा वापर करताना याद्वारे दिनांक 21 नोव्हेंबर 2026 रोजी 00.01 वाजले पासून ते दिनांक 05 डिसेंबर 2026 रोजीचे मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत 15 दिवसांसाठी पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्दीत खालील प्रतिबंध लागु करीत आहे.

पाच किंवा अधिक व्यक्तीच्या कोणत्याही संम्मेलनास प्रतिबंध, कोणत्याही व्यक्तीची कोणतीही मिरवणूक आणि कोणत्याही मिरवणूकीत लाऊडस्पिकर, वाद्ये, वाद्य बँड आणि फटाके फोडण्याचा कोणताही वापर आदेशात समाविष्ट असलेल्या मनाईसाठी खालीलप्रमाणे सुट देण्यात आली आहे.

सर्व प्रकारचे विवाह समारंभ इ. अत्यसंस्कार, सभा, सहकारी संस्था, इत्तर संस्था आणि संघटनाची कायदेशीर बैठका कंपन्या, क्लब, सहकारी संस्था, इतर संस्था आणि संघटनाची कायदेशीर बैठका, सामाजिक मेळावे आणि क्लब सहकारी संस्था इतर सोसायट्या आणि संघटना याचे सामान्य व्यवहार करण्यासाठी त्यांची बैठक चित्रपटगृहे, नाटकगृहे किया सार्वजनिक करमणूकीच्या कोणत्याही विकाणी किंवा त्याभोवती चित्रपट नाटक किया कार्यक्रम पाहण्याच्या उददेशाने संमेलने, सरकारी किंवा निम सरकारी कार्ये पार पाडण्यासाठी सरकारी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थाची कायदे न्यायालये किंवा कार्यालयामध्ये किंवा त्याभोवती लोकांचे संमेलन, शैक्षणिक उपक्रमासाठी शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थामध्ये किवा त्यांच्या आसपास संमेलने. कारखाने, दुकाने आणि आस्थापनामध्ये सामान्य व्यापार, व्यवसाय आणि आवाहनायाठी संमेलने, अशा इत्तर संमेलने आणि मिरवणूकीत ज्यांना विभागीय पोलीस उप आयुक्त सोलापूर शहर आणि त्यांचे पर्यवेक्षक अधिकारी यांनी परवानगी दिली आहे.

पोलीस उप आयुक्त पुढे असे निर्देशीत करतात की, हा आदेश सोलापूर शहरात सार्वजनिक ठिकाणे, न्यायालये, सरकारी कार्यालये यांच्या सुस्पष्ट भागामध्ये त्याच्या प्रती चिकटवून आणि लाऊडस्पिकर किंवा मेगाफोनच्या माध्यमातून तसेच उपलब्ध असलेल्या कोणत्याही स्वरुपात प्रसारमाध्यद्वारे प्रसिध्द करून प्रकाशित केला जाईल.

असे आदेश पोलीस उप-आयुक्त, डॉ. अश्विनी पाटील यांनी दिले आहेत.

जाहीर प्रसिध्दीकरण क्रि. कि. अर्ज नं. २१३/२०२६

मोहोळ येथील मे.ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग-१ सो, यांचे कोर्टात

अहमदअली बाबू शेख वय-५८ वर्षे, धंदा-मजूरी, रा. शेख फरीदबाबा दर्जाजवळ आण्णाभाऊ साठे नगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. } अर्जदार

विरूद्ध

मुख्याधिकारी सो, नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, जि.सोलापूर. } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार अहमदअली बाबू शेख हे मोहोळ,ता. मोहोळ येथे राहते घरी दि.०१/०६/१९६८ रोजी जन्मलेला आहे.त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत/नगरपरिषद मोहोळ,ता.मोहोळ,जि.सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झ लेली नाही.अर्जदाराच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत/नगरपरिषद मोहोळ चे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार अहमदअली बाबू शेख याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत/नगरपरिषद मोहोळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत अथवा दि.२२/१२/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता.२०/११/२०२६

लिपीक फौजदारी न्यायालय, मोहोळ — कोर्टाचा शिक्का — सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, मोहोळ.

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)

अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू




जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) नेहरू यांच्या नंतरचे भारताचे एक पंतप्रधान २) जवळीक, चिकटून राहणे ३) दिल्लीचे मुख्यमंत्री ४) बड उलट लिहा ५) पंढरीला नियमित जाणारे भाविक ६) भारताचे माजी राष्ट्रपती-*** मुखर्जी ७) बोलावण्यासाठी दिलेली साद ८) डाळ शिजताना होणारा आवाज ११) बे पंचे १३) श्रीरामाने या सेनेच्या मदतीने लंकेवर विजय मिळवला १७) मेंदू १८) वास, गंध २०) राक उलट लिहा २२) भित्रा, भ्याड २४) किंमती ऐवज, वस्तू २५) पाकचे माजी पंतप्रधान-*** शरीफ २६) आश्चर्य ३१) नवा कोरा, न चुरघळलेला ३२) खर्चात केलेली बचत ३४) लग्नातील नवरी मुलगी ३५) एक म्हण-** करी काम ३६) आकाशात उंचावरून घिरट्या मारणारा पक्षी ३८) उन्हाळा (इंग्रजीत) ४०) सर्व (हिंदीत) ४१) पाण्यात विहरणारा एक सफेद रंगाचा पक्षी ४२) जरचा साथीदार ४४) सभोवताली घातलेला गर्दीचा वेढा ४६) श्रवणेंद्रिय ४७) पक्ष्याचे पंख, परंतु (हिंदीत) ४८) कुलुपाची चावी

आडवे शब्द : १)भाजप उभारणीतील वाजपेयी यांचे सच्चे साथीदार ६)आ. बच्चू कडू यांची संघटना ९) घराची तुळई १०) ताणला जाणारा लवचिक पदार्थ ११) मजबूत १२) तंबाखू वा इतर साहित्य ठेवण्याची छोटी पिशवी १४) हव्यास, स्वार्थी भावना १५) दहा गुणिले नऊ १६) सायकलचे चाक, कागदी दस्त्यांचे माप १८) वर्गातील मुलांची एकूण संख्या १९) वाढदिवशी हा कापतात २१) भाजप नेते-नितीन **** २३) श्रीविष्णू पत्नी, लक्ष्मी देवी २५) समोर झालेली दृष्टीभेट २७) निवडणुकीत उमेदवाराला हे दान करतात, व्होट २८) पांघरण्याचे उबदार वस्त्र २९) भाविकांचे पंढरपूरला पायी जाणे ३०) एक म्हण-बडा घर *** वासा ३२) रात्री चमकणारा किटक ३३) पटकन, लगेच ३६) डोंगरातील वळणाचा रस्ता ३७) लहान बाळाला ही टोचतात ३९) शपथ (हिंदीत) ४१) प्रगती, भरभराट ४३) पैसे (इंग्रजीत) ४४) श्रीमंतच्या विरूध्दार्थी शब्द ४५) राज्य चालविणारे शासन ४७) भाकरी थापण्याची मोठी थाळी ४९) रंग (इंग्रजीत) ५०) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे ५१) भारताची राजधानी

सुडोकु - 104

9			1	3			8	
								7
8			7	6	4	9	1	2
6					9	1		8
5		3	8	7		6		9
				5			7	4
	1	9	4					5
			9			2	4	3
		2	6	8	3	7		

राज्यातील प्रदूषण कमी करण्यात प्रदूषण नियंत्रण मंडळाची भूमिका महत्त्वाची - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ राज्यभर प्रदूषण नियंत्रणासाठी महत्त्वपूर्ण काम करत असून, प्रदूषण कमी करण्यासाठी मंडळाची भूमिका मोलाची आहे. सर्वसामान्य नागरिक आणि भाविक वारकऱ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी मंडळाच्या वतीने अनेक वर्षापासून 'पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आयोजित 'कार्तिकीची वारी, पंढरीच्या दारी' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, नगराध्यक्षा प्रणिती भालके, मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, माजी आमदार शहाजी पाटील, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, कार्यकारी अभियंता अमित निमकर, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे



आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून पर्यावरण जागृतीचा संदेश गावोगावी पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. व्हॅनच्या माध्यमातून जनजागृती, प्लास्टिक बंदीसारखे निर्णय आणि प्रदूषण करणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. भावी पिढ्यांचे उज्ज्वल भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण केल्यास पर्यावरणपूरक समाज घडण्यास मदत होईल. वृक्षलागवड मोठ्या प्रमाणात करण्यासाठीही सर्वांनी पुढाकार घ्यावा.

आपल्या संतांनी अभंग आणि विचारांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, निसर्गचक्र आणि जलसंवर्धनाचे महत्त्व समाजाला पटवून दिले आहे. त्याच धर्तीवर प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून गोंधळ, पोवाडे आदी लोककलेद्वारे जनजागृती केली जात आहे. राज्यातील 310 तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर झाली असून, पर्यावरणाचे योग्य संवर्धन केल्यास निसर्गचक्र टिकून राहील आणि मानवाचे भविष्य उज्ज्वल होईल, असेही त्यांनी सांगितले.

आषाढी व कार्तिकी वारीदरम्यान पंढरपूर येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात. या भाविकांना शौचालये, स्वच्छता, पिण्याचे पाणी तसेच दर्शन रांगेतील आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कार्यरत आहे. प्रत्येक वारी पर्यावरणपूरक, निर्मल व स्वच्छ असावी, वारकऱ्यांना दजेर्दार सुविधा मिळाव्यात आणि ते समाधानी होऊन परतावेत, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रदूषण नियंत्रणाच्या कामात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत असून, तरुण पिढीचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून राज्यातील दीड लाखांहून अधिक उद्योगांच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी काम केले जात असल्याचे मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी सांगितले. राज्याला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी पर्यावरण संवर्धन महत्त्वाचे असून, प्रदूषण नियंत्रणाच्या कार्यात सर्वांनी सहकार्य करावे, असेही त्यांनी आवाहन केले.

मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार यांनी राज्यभर प्रदूषण नियंत्रणासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. प्लास्टिकचा वापर टाळून निसगार्शी नाते अधिक घट्ट करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे ते म्हणाले.

'पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी' या कार्यक्रमांतर्गत शाहीर प्रशांत जाधव, श्रीकांत रेणके, अनिल केदार, शैलाताई खांडगे आणि संजय कानडे यांनी लोककलेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाचे जनसंपर्क अधिकारी संजय भुस्कुटे यांनी केले.

जिल्हाधिकारी व प्रशासनाच्या कामाचे कौतुक

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १९ नोव्हेंबर रोजी कार्तिकी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर शहरात भाविकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी रस्ते दुरुस्ती, ६५ एकर परिसरात वारकऱ्यांसाठी कार्पेट व्यवस्था आणि अन्य सुविधांबाबत सूचना केल्या होत्या. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन आणि प्रशासनाने या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करून दुसऱ्याच दिवशी सुविधा उपलब्ध केल्याबद्दल त्यांनी प्रशासनाच्या कामाचे कौतुक केले. तसेच दर्शन रांगेच्या कामासाठी व सुविधा निर्माण करण्यासाठी कमी पडत असलेल्या अतिरिक्त 25 कोटी निधीलाही मंजुरी दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कार्तिकी वारीसाठी आलेल्या सर्व वारकरी आणि नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपमुख्यमंत्री आणि उपस्थितांनी टाळ-मृदंगाच्या गजरात 'ज्ञानोबा-तुकोबा'चा जयघोष करत पावली केली.

वसुंधरा संरक्षणाचा संदेश देणाऱ्या जनजागृती बसचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने पर्यावरण संवर्धन आणि वसुंधरा संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष प्रचार व प्रसिद्धी बसचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या या जनजागृती बसच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांत पर्यावरण संरक्षणाचा संदेश पोहोचविण्यात येणार आहे. 'वसुंधरेचे रक्षण करा', 'सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळा', 'कापडी पिशव्यांचा वापर करा' आणि 'निसर्ग वाचवा' अशा विविध संदेशांद्वारे नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण केली जाणार आहे.

प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरणासाठी घातक ठरत असल्याने नागरिकांनी एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा अवलंब करावा, तसेच पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, नगराध्यक्षा प्रणिती भालके, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संजय भुसकुटे, माजी आमदार शहाजी पाटील, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी बुद्धिमत्तेच्या जोरावर स्पर्धा परीक्षेत यश मिळवावे - प्रा. डॉ.संगमेश्वर नीला

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांचे ज्ञान, बुद्धिमत्ता, निर्णय क्षमता आणि व्यक्तिमत्त्वाची कसोटी पाहणारी मूल्यमापन परीक्षा असून त्यासाठी वेळेचे व्यवस्थापन, सकारात्मक दृष्टिकोन आत्मविश्वास, आणि संयम असल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेत निश्चित यश मिळते.असे प्रतिपादन वालचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ संगमेश्वर नीला यांनी केले.



मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते.समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी अध्यक्षस्थानी होते, यावेळी अडव्होकेट सम्राज्ञी नीला, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने उपजिल्हाधिकारी पासून ते राज्य पोलीस, कर सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक व लिपिक तर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, भारतीय परराष्ट्र सेवा, भारतीय वन सेवा अशा भरती परीक्षा घेतल्या जातात.

या परीक्षांमध्ये यश संपादन करण्यासाठी सामान्य अध्ययन, भारतीय राज्यघटना, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, विज्ञान, चालू घडामोडी, गणित आणि बुद्धिमत्ता चाचणी या विषयांचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते. याशिवाय प्रश्नपत्रिकांचा सराव, सराव परीक्षा, वृत्तपत्रांचे नियमित वाचन आणि संदर्भ पुस्तकांचा अभ्यास महत्त्वाचा असतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस. आर.लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ.शितल झिंगाडे भस्मे यांनी केले. तर, आभार प्रा.सौरभ भस्मे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापिका मनीषा शिंदे, सौंदर्या शास्त्री, ऐश्वर्या तारापुरे, जनाबाई चौधरी, प्राची गणेचारी उपस्थित होते.

बालभारती विश्वकोशाचे वाचन करा

स्पर्धा परीक्षेत यश संपादन करण्यासाठी एनसीईआरटी, बालभारती, सीसीआरटी, योजना, कुरुक्षेत्र, द हिंदू, लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस, विश्वकोश, इनसायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका आदीचे वाचन आवश्यक असते. असे प्रोफेसर डॉ. नीला यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

स्पर्धा परीक्षा देऊन विद्यार्थ्यांनी अधिकारी व्हावे

महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधा उपलब्ध केले आहे, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन राज्य व केंद्र सरकारच्या सेवेत अधिकारी व्हावे असे प्रतिपादन समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले.

अकलूज घोडेबाजार ग्रामीण अर्थचक्राला गती देणारे राष्ट्रीय पर्यटन केंद्र



अकलूज (कटूसत्य वृत्त):- कृषि उत्पन्न बाजार समिती अकलूजने सन २००९ मध्ये सुरू केलेला घोडेबाजार केवळ बाजार राहिलेला नसून तो एक ग्रामीण आर्थिक इको सिस्टीम बनला आहे. दिवाळीच्या दोन महिने अगोदर व पाडव्याच्या शुभ मुहुर्तावर सुरू होऊन दत्त जयंतीपर्यंत हा बाजार अव्याहतपणे सुरू राहतो.

महाराष्ट्रातील शास्त्रशुध्द व नियोजनबध्द घोडेबाजार म्हणून या बाजाराची ओळख आहे. उत्तरप्रदेश, पंजाब, मध्यप्रदेश, बिहार, हरियाणा या राज्यातून घोडेव्यापारी मारवाडी, काठीयावाडी, नुकरा, पंजाबी/थोरोब्रेड, सिंधी या प्रसिध्द जातीचे शर्यतीचे, नृत्य करणारे व लग्न समारंभासाठीचे, पर्यटनासाठी लागणारे विविध रंगाचे घोडे विक्रीसाठी आलेले आहेत.

घोडे साहित्याचा भव्य बाजार

बाजारामध्ये घोड्यांसोबतच घोड्यांना लागणा-या साहित्याचे स्टॉल्स लागलेले आहेत. घोड्यांचे सजावटीचे खोगीर, जिन, वेस्टन शाळेल,सपाठ, म्होरकी, गादी, शोल्डर, आंधेरी, बागरसी, चाळ, खरारा, आंब्रश, वायफर, हाथेली, गोंडे, ओढणी, बँडेज, कँडल बुट, आकर्षक रंगबेरंगी झुली, बेरींग, लगाम, लाईटच्या माळा, नालाबंदीचे साहित्य, सुती कंडे आणि आधुनिक डिझाईनचे साहित्य विक्रीसाठी उपलब्ध आहे. त्यामुळे घोडा खरेदी करणा-या व्यापा-याला सर्व साहित्य एकाच छताखाली मिळते.

अकलूजच्या पर्यटन आणि व्यापाराला बळ

या राष्ट्रीय स्तरावरील बाजारामुळे अकलूज परिसरात पर्यटन वाढले आहे. जातीवंत घोडे खरेदीसाठी आंध्रप्रदेश, कर्नाटक या राज्यातूनही व्यापारी बाजारामध्ये येतात. घोडेव्यापारी, खरेदीदार, घोडेशौकीन अकलूजमधील हॉटेल्स लॉजमध्ये मुक्काम करतात. त्यामुळे स्थानिक हॉटेल, लॉज, ट्रान्सपोर्ट, चारा, विक्रेते, अन्य छोट्या व्यवसायांना मोठी चालना मिळाली आहे. त्या कालावधीत रोजगारही उपलब्ध होत आहे. घोड्यांचा चाल, नाचकामासाठी शिकवण्यासाठी ट्रेनर, हालगीवादक व वाजवणारे कलाकारांना ही रोजगार उपलब्ध आहे. त्याबरोबर पशुवैद्यकीय अधिकारी यांनाही काम मिळत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात बाजारपेठेमध्ये आर्थिक उलाढाल होत आहे.

बाजार समितीचा आदर्श इम्पोर्टन्स मॉडेल

बाजार समितीने घोडेबाजारासाठी देशात आदर्श ठरेल अशी पायाभूत सुविधा निर्माण केली आहे.

- एक हजार झाडांची घनदाट सावली
- तटबंदीसह एकच सुरक्षा गेट
- अंतर्गत रस्ते
- पिण्याच्या पाण्याची सोय
- घोडे धुण्यासाठी पाण्याची टाकी
- घोडेबाजार निर्जंतुकीकरण फवारणी
- घोड्यांच्या स्पर्धा
- संगणकीकृत पावती प्रणाली, खरेदीदार,विक्रेता व घोडे यांचे फोटो असलेले पावती
- घोडेबाजारामध्ये लाईट व ध्वनीक्षेपण, मेगाफोन
- घोड्यांच्या शिकवणीसाठी अनुभवी ट्रेनर
- पार्किंगची सोय
- स्वागत कक्ष, माहिती केंद्र

प्रशासनाचे नियोजन

सभापती, सर्व संचालक मंडळ, सचिव, कर्मचारी यांनी केलेल्या नियोजनामुळे हा घोडेबाजार शिस्तबध्द व पारदर्शक पध्दतीने चालतो. व्यापा-यांना कोणताही त्रास होणार नाही. याची पूर्ण काळजी घेतली जाते. चालुवर्षी ११८० घोड्यांची आवक व २७९ घोड्यांची विक्री झालेली असून आजपर्यंत तिन कोटी वीस लाख रूपयांची उलाढाल झालेली आहे. दुष्काळाचे सावट असतानाही घोडे शौकीनातून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

शिक्षण हे केवळ उद्योगांशीच नव्हे, तर समाजाच्या प्रश्नांशीही जोडले गेले पाहिजे - चंद्रकांत पाटील

पुणे, (कटूसत्य वृत्त):- 'राज्यात दुष्काळ आणि पाणीटंचाईची परिस्थिती अत्यंत गंभीर असून, त्यावर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी शिक्षण संस्था, स्थानिक प्रशासन आणि समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. प्रकल्प-समस्या आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समाजात जाऊन समस्या समजून घेत उपाय शोधण्यास प्रोत्साहित करते. आपले शिक्षण हे केवळ उद्योगांशीच नव्हे, तर समाजाच्या प्रत्यक्ष प्रश्नांशी जोडले गेले पाहिजे,' असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे आयसर पुणे येथे आयोजित 'उच्च शिक्षणातील समस्या-आधारित शिक्षण' या विषयावरील प्रादेशिक संशोधन परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील समन्वय वाढविण्याच्या उद्देशाने सोलापूर येथील चौथ्या 'रिजनल रिसर्च सिम्पोजियम ऑन प्रोजेक्ट अँड प्रॉब्लेम-बेस्ड लर्निंग' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे होत्या. आयआयटी रोपरचे संचालक प्रा. राजीव आहुजा विशेष अतिथि म्हणून उपस्थित होते. डेन्मार्कमधील अलबोर्ग विद्यापीठाच्या युनेस्को पीबीएल सेंटरच्या संचालिका प्रा. व्हियानग्यून डू, विद्यापीठाचे संस्थापक-कुलगुरू डॉ. गोपाळकृष्ण जोशी आणि आयसरचे संचालक प्रा. सुनील भागवत याप्रसंगी उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले,



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करताना इंटर्नशिप, प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण आणि अप्रेंटिसशिपचा पदवी अभ्यासक्रमात समावेश करावा. तसेच समस्याधारित शिक्षणातून विद्यार्थ्यांना वास्तविक समस्यांवर उपाय शोधण्याची संधी द्यावी.

- चंद्रकांत दादा पाटील, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

'राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या टप्प्यावर एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या पुढाकारातून ही महत्त्वाची परिषद होत आहे. "समस्या-आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनातील समस्यांचा शोध घेण्यास, एकत्र काम करण्यास आणि ज्ञानाचा व्यावहारिक वापर करण्यास प्रवृत्त करते. यातून रोजगार आणि सुजाण नागरिकत्वासाठी आवश्यक असलेले चिकित्सक विचार, सर्जनशीलता, संवादकौशल्य आणि सांघिक वृत्ती हे गुण विकसित होतात. ही कौशल्ये रोजगाराबरोबरच जबाबदार नागरिक घडविण्यासाठीही आवश्यक आहेत."

प्रा. स्वाती कराड चाटे यांनी समस्या-आधारित शिक्षणाचा शालेय स्तरावरही व्यापक अवलंब करण्याची गरज व्यक्त केली. 'उच्च शिक्षणात येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत ज्ञानासोबतच संवादकौशल्यांची कमतरता जाणवते. विद्यार्थ्यांनी समाजातील समस्या ओळखून त्यावर चर्चा करावी आणि सामूहिकरीत्या उपाय शोधावेत. यातून त्यांचा आत्मविश्वास आणि संवादकौशल्य विकसित होण्यास मदत होईल,' असे त्या म्हणाल्या.

प्रा. राजीव आहुजा यांनी शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शाळांमध्ये प्रशिक्षित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षकांची गरज व्यक्त केली. 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात शिक्षकांनी अध्यापनात नावीन्य आणून विद्यार्थ्यांना वर्गाकडे आकर्षित केले पाहिजे. इंटरनेटवर सहज उपलब्ध नसलेले ज्ञान, अनुभव आणि मार्गदर्शन शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावे,' असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. व्हियानग्यून डू यांनी समस्या-आधारित शिक्षण ही विविध ज्ञानशाखांना जोडणारी आणि समाजात अर्थपूर्ण बदल घडविणारी कार्यपद्धती असल्याचे सांगितले. डॉ. गोपाळकृष्ण जोशी यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. कृष्णकेदार गुमास्ते यांनी उपस्थितांचे स्वागत केले, प्रा. रूपाली धामणे यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक डॉ. प्रभा कासलीवाल यांनी आभार मानले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार दिंडी सोहळ्यांना कार्पेटचे वाटप

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी वारी २०२६ च्या अनुषंगाने वारकरी भाविकांसाठी करण्यात आलेल्या नियोजनाचा व सुविधांचा आढावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथील विविध ठिकाणी पाहणी केली. यावेळी त्यांनी भक्तीसागर ६५ एकर परिसरातील दिंडी सोहळ्यांच्या निवास व्यवस्थेची पाहणी केली.



या पाहणीदरम्यान ज्या दिंडी सोहळ्यांना कार्पेट उपलब्ध नाही, अशा दिंडी सोहळ्यांना तातडीने कार्पेट उपलब्ध करून देण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना दिल्या होत्या.

त्यानुसार जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते आज कार्पेट उपलब्ध नसलेल्या दिंडी सोहळ्यांना कार्पेट वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. यामुळे भक्तीसागर ६५ एकर परिसरात वास्तव्यास असलेल्या वारकरी भाविकांना दिलासा मिळाला आहे.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे आदी उपस्थित होते.

ऑर्किड स्कूलच्या विद्यार्थिनींना सोलापूर मध्ये जिल्हा स्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत गोल्ड मेडल

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरातील नामांकित नागेश करजगी ऑर्किड स्कूल मधील विद्यार्थिनींनी ने शालेय शहरस्तरीय बास्केटबॉल क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत प्रथम क्रमांक प्राप्त केले आहे

.या स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सोमपा क्रीडा कार्यालय सोलापूर शालेय शहरस्तरीय बास्केटबॉल क्रीडा स्पर्धेत सोलाउत्कृष्ट तांत्रिक खेळ,अष्टपैलु कामगिरी आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी प्रति स्पर्धेत पोलीस पब्लिक स्कूल सोबत 35 - 18 ने मात करत



प्रथम क्रमांक प्राप्त केलेले आहे. यामुळे यांची सांगोला येथे होणाऱ्या विभाग स्पर्धे साठी निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा सौ.वषार्ताई विभुते, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेचे मेंटर सौ.मीना पारखे, शाळेचे प्राचार्या सौ.रश्मी कुंभार यांनी शुभेच्छा दिल्या.

वरील सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा विभाग प्रमुख आनंद लिगाडे, ज्ञानदीप जाधव, अश्विनी ढेरे आणि जमाल सर यांनी मार्गदर्शन केले.

कार्तिकी वारीत वारकऱ्यांना दर्जेदार आरोग्य सुविधा द्या - सभापती चेतनसिंह केदार सावंत

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- आगामी कार्तिकी एकादशी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेने सज्ज राहून वारकऱ्यांना दजेर्दार आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वारी काळात आरोग्य सेवेत कोणत्याही प्रकारची कमतरता राहू नये, अशा स्पष्ट सूचना जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिल्या.

जिल्हा परिषद सोलापूर येथे सभापती चेतनसिंह केदारसावंत यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य व शिक्षण समितीची मासिक सभा पार पडली. या सभेत जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सर्व आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम



करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सभेत राष्ट्रीय कुटुंब कल्याण, माता व बाल आरोग्य, कुष्ठरोग निर्मूलन, क्षयरोग नियंत्रण, हिवताप आणि हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. याशिवाय औषधसाठा, आरोग्य सुविधा ॲप, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, एनआरएचएम कर्मचाऱ्यांचे प्रश्न, जन आरोग्य समिती सदस्यांची निवड तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा करण्यात आली.

जन आरोग्य संवाद यात्रेदरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळनेर (ता. माढा) यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाची राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रशंसा केली होती. या उल्लेखनीय कामाची दखल घेत आरोग्य व शिक्षण समितीच्या सभेत ठराव मंजूर करून सदस्यांनी टाळ्यांच्या गजरात पिंपळनेर आरोग्य केंद्राचे अभिनंदन केले. तसेच बार्शी तालुक्यात बोगस डॉक्टरांविरोधात राबविण्यात आलेल्या धडक मोहिमेचेही सदस्यांनी कौतुक केले.

गोरगरीब रुग्णांना उपचारासाठी खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागू नये, यासाठी शासकीय आरोग्य संस्थांनी दर्जेदार आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा आरोग्य संस्थेत औषधांचा तुटवडा जाणवता कामा नये. औषधांच्या उपलब्धतेबाबत सर्वांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश केदार सावंत यांनी दिले. तसेच लसीकरणाची प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रनिहाय आकडेवारी पुढील सभेत सादर करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी नव्या ॲपद्वारे योजनांची माहिती संकलित करून अद्ययावत ठेवावी. सर्व तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करून जिल्ह्याच्या आरोग्य सेवेचा दर्जा उंचवावा. आरोग्यविषयक कार्यक्रमांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही सभापती केदार सावंत यांनी दिली.

या सभेस समिती सदस्य सोनाली परसम्मा कडते, संदीप अमृत टेळे, नागनाथ पांडुरंग भोसले, सविता संजय कोकाटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिवंत, प्रशासन अधिकारी डॉ. वरवटकर, मंजूळ, निटोरे, पीएचएन प्रतिनिधी, गोपाळ शिंदे यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

अकलूज येथील सुप्रसिद्ध डॉ. श्रीकांत देवडीकर यांचा नाशिक येथे गौरव

अकलूज (कटूसत्य वृत्त):- नाशिक येथे आयोजित Indian Society of Nephrology – West Zone (ISNWZ) Conference 2026 या प्रतिष्ठित वैद्यकीय परिषदेत अकलूज येथील देवडीकर मेडिकल केअर सेंटरचे डॉ. श्रीकांत नंदकुमार देवडीकर यांना चेअरपर्सन म्हणून काम करण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळाली. त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाच्या दृष्टीने ही बाब अभिमानास्पद मानली जात आहे.

या परिषदेत देशभरातील तसेच पश्चिम विभागातील नामवंत नेफ्रॉलॉजिस्ट आणि वैद्यकीय तज्ज्ञ सहभागी झाले होते. यावेळी किडनीविकारांचे निदान, आधुनिक उपचारपद्धती, प्रतिबंधात्मक उपाय



आणि वैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन संशोधन यावर सखोल चर्चा व ज्ञानाची देवाणघेवाण करण्यात आली.

वैद्यकीय क्षेत्रात सातत्याने बदल होत असताना अशा राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक परिषदांना विशेष महत्त्व आहे. आधुनिक वैद्यकीय ज्ञान आत्मसात करून त्याचा लाभ रुग्णांना मिळवून देण्याच्या दृष्टीने ही परिषद उपयुक्त ठरली.

या परिषदेत चेअरपर्सन म्हणून जबाबदारी पार पाडण्याची संधी मिळाल्याबद्दल डॉ. देवडीकर यांनी आयोजक आणि सहकाऱ्यांचे आभार मानले. ज्ञानवृद्धी, सेवाभाव आणि रुग्णहित हेच आपल्या वैद्यकीय प्रवासाचे केंद्रबिंदू असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

अकलूजमधील वैद्यकीय क्षेत्रासाठी ही निश्चितच अभिमानाची बाब असून, डॉ. श्रीकांत देवडीकर यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.